# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी
## मार्केट विभाग
## हमीपत्र

मी/आम्ही अध्यक्ष (अध्यक्षाचे नांव) ------------------------------------------------ व सचिव (सचिवाचे नांव) ----------------------------------------- या द्वारे येथे गंभीर प्रतिपादन करतो की, मी /आम्ही (गणेशोत्सव मंडळ नांव व पत्ता ) ---------------------------------------------------------- अध्यक्ष ------------------------------------------ व सचिव ----------------------------------------- या नोंदणीकृत / अनोंदणीकृत मंडळाचा अध्यक्ष / सचिव अधिकृत स्वाक्षरी कर्ता असून त्यांचा नोंदणी क्र. ------ ------------------------- हा आहे. गणेशोत्सव २०२३ साजरा करणेसाठी सारासार विचार करुन खालील हमीपत्र देत आहोत.

१) आमच्या सार्वजनिक गणेश मुर्तीची विसर्जन आम्ही मंडपालगतच्या / नजिकच्या कृत्रिम तलावातच प्राधान्याने करण्याचा प्रयत्न करु.

२) मी/ आम्ही अशी हमी देतो की, उपरोक्त सर्व अग्नि सुरक्षा आवश्यकतांचे उपरोक्त उत्सवादरम्यान आमही पूर्णपणे पालन करु. तसेच मी / आम्ही जिच्या द्वारे आग लागेल अथवा आरोग्यास अपाय होईल अशी कोणतीही कृती करणार नाही.

३) मी /आम्ही अशी हमी देतो की, मी /आम्ही मंडपामध्ये विद्युत उपकरणे अथवा संसाधने बसविताना ती मान्यता प्राप्त विद्युत निरीक्षक यांचे निगराणीखाली विद्युत अधिनियम २००३ च्या तरतुदीनुसार बसवून घेवू.

४) मी /आम्ही अशी हमी देतो की, महाराष्ट्र फायर प्रिव्हेन्शन ॲण्ड लाईफ सेफ्टी मेजर्स ॲक्ट २००६ च्या कलम ३/३ (तसेच महाराष्ट्र फायर प्रिव्हेन्शन ॲण्ड लाईफ सेफ्टी मेजर्स नियम २००९ च्या नियम क्र. ४ ) आणि नियम (क्र.१) २ मधील सर्व अग्नी सुरक्षा उपाययोजनांचा अवलंब करु व ही सर्व अग्नी सुरक्षा उपकरणे सुस्थितीत ठेवू.

५) मला /आम्हांला याची जाणीव आहे की, मंडपांच्या परवानगी व्यतिरिक्त तात्पुरते किंवा पक्के बांधकाम केल्यास इचलकरंजी महानगरपालिकेकडून उपरोक्त परवानगी रद्द करणेत येईल.

६) मला / आम्हांस ही परवानगी दिल्यामुळे महानगरपालिका आयुक्त, त्यांचे अधिकारी, सेवक व अभिकर्ता यांना त्यांच्या विरोधात करण्यात येणारी कोणतीही कारवाई, नुकसान भरपाई, मागणी, दावे इ. पासून या हमीपत्राद्वारे बंधमुक्त करीत आहोत. उपरोक्त बाबी उद्भवल्यास त्यास सर्वस्वी मी / आम्ही जबाबदार असल्याचे या द्वारे मान्य करीत आहोत व त्याची सर्व जबाबदारी स्वेच्छेने घेत आहोत.

७) मी /आम्ही याद्वारे प्रतिपादन करतो की, मी वर व मंडप परवानगी अर्जामध्ये दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे संपूर्णतः खरी असून ती चुकीची आढळल्यास माझेवर / आम्हांवर दिवाणी अथवा फौजदारी कारवाईस मी /आम्ही पात्र असू याची मला / आम्हांला जाणीव आहे. व मला /आम्हांस ते मान्य आहे.

८) केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या दि. १२/०५/२०२० इ. रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना (जल, वायू, ध्वनी, पर्यावरण, रोषणाई इ.) चे तंतोतंत पालन करेन.

९) सन २०२३ साली गणेशोत्सव मध्ये स्थापित करण्यात येणारी गणेशमुर्ती कमीत कमी उंचीच ठेवू.

१०) इ.म.पा. व पोलिस प्रशासन यांनी घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करु.

~~११) काही विशिष्ट परिस्थितीत दिलेली परवानगी काढून घेण्याचे अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला असून याची कोणतेही कारणे दिली जाणार नाहीत हे आम्हांला मान्य आहे.~~

१२) सन २०२३ च्या सार्वजनिक गणेशोत्सवांसंदर्भात वेळोवेळी प्रशासनाकडून देण्यात आलेल्या निर्देशांचे /अटी - शर्तीचे उल्लंघन झाल्यास सबंधीत पर्यावरण (संरक्षण ) अधिनियम १९८६ अन्वये मी / आम्ही कारवाईस पात्र ठरेन हे आम्हांला मान्य आहे.

१३) मी /आम्ही याद्वारे प्रतिपादन करतो व हमी देतो की, सदर हमीपत्र हे उपरोक्त मंडळाचे अध्यक्ष, सचिव, सर्व कार्यकारणी सदस्य व प्राधिकृत व्यक्तींवर बंधनकारक राहील.

मी / आम्ही ------------------------------------ असे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, उपरोक्त माहिती ही माझ्या / आमच्या माहितीप्रमाणे खरी व अचूक असून ती मी स्वतः / आम्ही पडताळली आहे.

**अध्यक्ष** **सचिव**

**गणेश मंडळाचे नांव-**

**मो.नं.**